**उद्दिष्टे :**

१) डॉ. रखमाबाई यांच्या बालपणीचा,आणि कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करणे.

२) डॉ. रखमाबाई यांच्या शैक्षणिक आणि वैद्यकीय कार्याचा अभ्यास करणे.

३) डॉ. रखमाबाई यांच्या स्त्री दृष्टीकोण विषयक कार्याचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

१) ज्या काळी शिक्षणास विरोध होता त्या काळी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले.

२) स्त्री मुक्तीच्या चळवळीसाठी योगदान व स्त्रियांसाठी कल्याणकारी दृष्टीकोण त्यांच्या स्वभावात दिसून येतो.

**संशोधन पद्धती :**

सदर शोध निबंधासाठी संशोधकाने, वर्णनात्मक संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती सोबत, प्राथमिक, दुय्यम संदर्भ ग्रंथ, मासिके, ऐतिहासिक दस्तऐवज, ऑनलाईन साधने, या साधनांचा वापर करून प्रस्तुत शोध निबंधासाठी माहिती संकलित केली आहे.

**जन्म आणि बालपण :**

डॉ. रखमाबाई राउत यांचा जन्म २२ नोव्हेंबर १८६४ रोजी झाला. आई जयंतीबाई आणि वडील जनार्दन पांडुरंग सावे, वडील बांधकाम क्षेत्रात कंत्राटदार म्हणून होते. त्यात रखमाबाई या ३ वर्षाच्या असतांना त्यांच्या वडिलांना देवाज्ञा झाली. १७ वर्षाच्या जयंतीबाई या रखमाला घेऊन स्वतःच्या वडिलांकडे राहायला आल्या. आणि त्यांनी दुसरे लग्न केले रखमाबाई यांच्या सावत्र वडिलांचे नाव डॉ. सखाराम अर्जुन राऊत असे होते. रखमाबाईचे मराठी शाळेत शिक्षण झाले. ११ व्या वर्षी रखमाबाई यांचे लग्न होतकरू आणि शिक्षित दादाजी बरोबर लाऊन दिले. त्या काळी रिवाजाप्रमाणे रखमाबाई आपल्या माहेरीच राहत. लग्नात शिक्षण करू देईन अस म्हणणाऱ्या दादाजी ने शब्द पाळला नाही. त्याला टी.बी. सारख्या आजाराने ग्रासले होते. तो मामांकडे राहायचा पण मामाचे चारित्र्य ठीक नव्हते म्हणून रखमाच्या आईने त्यांना नांदायला पाठविले नाही. अशा कष्टमय काळात त्यांनी दिवस काढले.

**रखमाबाईचा खटला आणि घटस्फोट :**

जुन्या काळात नवरा कसाही असला तरी त्याला परमेश्वराच्या बरोबरीचे स्थान दिले जात होते. त्याने कितीही त्रास दिला तो कसाही असला तरी त्याच्या सोबत संसार करणे हा स्त्री धर्म आहे असे मानत. रखमाला नांदायला पाठवलं नाही म्हणून दादाजी चिडला आणि त्याने वकिलामार्फत रखमाला नोटीस पाठवली. दादाजीने १८८४ साली कोर्टात केस दाखल केली. पण खंबीर रखमाबाईने कोर्टापुढे आपली बाजू मांडली. लहान वयातच लग्न झालं नवऱ्याने शिक्षणाचे कबुल करूनही शिक्षण घेवू दिले नाही. तो सतत आजारी असतो, अशा माणसासोबत कसा संसार करायचा हा प्रश्न त्यांनी कोर्टाला विचारला. १८८६ साली सरन्यायाधीश सार्जेंट आणि न्यायमूर्ती बेली, यांच्या अपीलीय नायालयाने **“ हिंदू विवाह हा संस्कार आहे. आणि त्याला संबंधित पक्षकरांच्या संमतीची आवश्यकता नाही”.** असे मत मांडले. दादाजी वरच्या कोर्टात गेला. आणि इंग्रजांनी देखील न्यायासाठी लढणाऱ्या रखमाबाई साठी **“रखमाबाई बचाव समिती”** स्थापन केली. त्यातच १८८५ साली त्यांच्या सावत्र वडीलांचे निधन झाले. रखमाबाईच्या वकिलांनी मोठ्या हुशारीने दादाजीला दोन हजार रुपये देण्याची तयारी दर्शवली दादाजीला पण तिच्या संपत्तीत स्वारस्य

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

असल्यामुळे त्याने अट मान्य केली. व रखमाबाई दादाजी पासून कायद्याने विभक्त झाल्या, शेवटी जुलै १८८८ साली या विषयावर पडदा पडला.

**वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्लंडचा प्रवास :**

डॉक्टर होण्याची जिद्द मनात बाळगून इंग्लंडला जाण्याची तयारी केली. त्याकाळी इंग्लंड सारख्या देशात सुद्धा महिलांचे वैदकीय शिक्षण घेण्याचे प्रमाण खूप कमी होते. वयाच्या २२ व्या वर्षी आपल्या समाजापासून आणि कुटुंबापासून हजारो मैल दूर जाण्याचे धाडस त्याकाळी रखमाबाई यांनी दाखवले. त्यासाठी त्यांच्या आजोबा आणि आईने त्यांचे मनोबल वाढवले. १८८९ साली त्या बोटीने इंग्लंडला गेल्या. वसतिगृहात राहून त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. चांगल्या गुणांनी पास होऊन देखील त्यांना पदवी मिळाली नाही कारण स्त्रियांना पदवी देणे इंग्लंड विद्यापीठाच्या नियमात बसत नव्हते. नंतर पदवी परीक्षेसाठी त्या स्कॉटलंडला गेल्या आणि उत्तम रीतीने पास होऊन डॉक्टर झाल्या. आनंदीबाई जोशी वैद्यकीय व्यवसाय सुरु करण्यापूर्वीच स्वर्गवासी झाल्या. दुसरी स्त्री डॉक्टर मानकबाई यांची देखील हीच शोकांतिका झाली. पण रखमाबाई खूप वर्षे सर्व सामान्य स्त्रियांची सेवा करत राहिल्या.

**भारतातील सामाजिक आणि वैद्यकीय सेवेचे कार्य :**

रखमाबाईंनी टाईम्स ऑफ इंडिया मध्ये **“द हिंदू लेडी”** या टोपण नावाने दोन पत्रे लिहिली. बालविवाह, सक्तीचे वैधव्य, आणि पडदा पद्धत या विषयावरही त्यांनी भाष्य केले. लग्नाचे वय मुलींसाठी १५ आणि मुलांसाठी २० करावे अशी सरकारला विनंती केली. त्यांनी पतीसोबत नांदायला जाण्यास दिलेला नकार म्हणजे “बालविवाह” च्या प्रथेला दिलेले आव्हान अशी भुमिक त्यांनी मांडली. “हिंदू लेडी” च्या पत्रांनी समाजात मात्र खळबळ माजली.

रखमाबाईंनी इंग्लंडमधुनच ‘कामा’ हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदासाठी अर्ज केला. त्यांचा अर्ज मंजूर होऊन १८९५ साली त्या कामावर रुजू होण्यासाठी भारतात परतल्या. सहा महिने या इस्पितळात राहून त्यांनी सर्जन चे कार्य केले. नंतर त्यांनी सुरत च्या इस्पितळात काम केले. भारतात त्यांचे अनेक ठिकाणी सत्कार झाले. त्याकाळी सुरत मध्ये बाळंतपणासाठी इस्पितळात महिलांना येण्यास संकोच वाटत आणि ते घरातच बाळंतपण करत परंतु डॉ. रखमाबाई या स्वतः घरा-घरात जाऊन स्त्रियांना समजावण्याचे कार्य करत. आणि आरोग्यासाठी कसे चांगले हे पटवून देत. त्यांनी २२ वर्षे सुरत मध्ये काम केले. लहान बालकांसाठी त्यांनी “बालक मंदिर” स्थापन केले. राजकोट आणि सौराष्ट्र प्रांताच्या प्रमुख डॉक्टर म्हणून काम पहिले. देशाला स्वातंत्र्य मिळालेले त्यांनी डोळयांनी पहिले. वयाच्या ९० व्या वर्षी १९५५ साली त्यांची प्राणज्योत मालवली, परंतु स्त्री चळवळी स्त्री स्वातंत्र्यासाठी,आणि वैद्यकीय शिक्षणाच्या सेवेतून त्यांनी अमर अशी मशाल कायमस्वरूपी पेटवून त्या काळातीलस्त्री जीवन प्रकाशमान बनवले.

**निष्कर्ष :**

१) डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या नंतर डॉ. रखमाबाई यांनी वैद्यकीय सेवेची धुरा सांभाळली आणि दीर्घकाळ सेवा त्यांचा हातून घडली.

२) स्त्री समाज प्रबोधन, अस्पृश्यता निवारण आणि आरोग्याविषय व्याख्यानमाला असे अनेक उपक्रम हाती घेतले.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

३) डॉ. रखमाबाई यांनी स्त्रियांच्या हक्कासाठी स्त्री मुक्तीच्या चळवळीसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

४) धर्म,परंपरा आणि प्रचलित कायदा यांना देखील अठराव्या शतकात स्व प्रज्ञेने आव्हान दिले.

५) डॉ. रखमाबाई यांच्यामुळे मुलींच्या लग्न,वय आणि संमती विषयी पहिल्यांदाच बोलले गेले.

**संदर्भ ग्रंथ :**

**१)** रॉय कविता, (२०२१) लेडी डॉक्टर्स, वेस्टलॅंड पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, चेन्नई.

**२)** वर्दे मोहिनी, (१९८२), डॉ. रखमाबाई एक आर्त, पोप्युलर प्रकाशन, मुंबई.

**३)** सीमा केतकर, (१९९७), डॉ. रखमाबाई, भारत ज्ञान विज्ञान समिती, पुणे. (महाराष्ट्र)

**४)** चंद्र सुधीर (२०१२), रखमाबाई स्त्री अधिकार और कानून, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली.

**५)** Kosambi M.(2001), A Prismatic Presens :The Multiple Iconisation of Dr Anndibai Joshees and the politics of life Writing. Australian Feminist Studies.

**६)** Erill, Astrid (2008), Cultural Memory Studies :An introduction, de Gruyter.

**७)** https://en.wikipedia.org/wiki/Rukhmabai

**८)** https://indianexpress.com/article/who-is/who-was-rukhmabai-raut-4949058/

**९)** https://www.herzindagi.com/society-culture/rukhmabai-raut-india-first-woman-doctor-medicine-british-india-article-238373

**१०)** https://www.docplexus.com/posts/dr.-rukhmabai-untold-journey-of-first-female-practitioner-of-india

*Cite this Article:*

Dr. Varma M.J. & Kumari. Teli G.J. (2023). ***समाजसुधारक स्त्रीरत्न रखमाबाई राऊत***. In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 295–298). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464227